# मनोगत

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवीसाठी ''दलित कादंबरीच्या दृष्टिकोनातून 'शूद्र' चा अभ्यास'' या विषयावरील लघुप्रबंध सादर करताना खूप समाधान व त्याचबरोबर आनंद वाटत आहे. गेली अडीच-तीन वर्षे मी मराठी विभागात एम. फिल. करत आहे. या दरम्यान अनेक बरेवाईट अनुभव आले, अनेक अडचणी आल्या खऱ्या; पण दरम्यानच्या काळात माझे गुरूवर्य, माझे कुटुंबीय, माझे मित्र-मैत्रिणी यांचे अनमोल सहकार्य व प्रेरणा मिळाली. याचेच फलित म्हणजे हा लघुप्रबंध होय. म्हणूनच त्यांचे आभार मानणे मी माझे आद्यकर्तव्य समजतो.

आळवेसारख्या छोट्याशा खेड्यात जन्मल्यामुळे आणि त्यातही शेतकरी कुटुंबात जन्मल्यामुळे ग्रामीण साहित्याची ओढ पहिल्यापासूनच होती. एम. ए. नंतर नेट परीक्षेचा अभ्यास करताना मात्र माझी पहिल्यांदा खऱ्या अर्थाने दलित साहित्याशी ओळख झाली. आणि दलित समाजाच्या संघर्षमय जीवनजाणिवा समजून घेण्याचे वेड लागले. त्यामुळेच मी ''दलित कादंबरीच्या दृष्टिकोनातून 'शूद्र' चा अभ्यास'' हा विषय एम.फिल.साठी निवडला.

माझ्या संशोधन कार्यासाठी मला आदरणीय डॉ. जी. पी. माळी सरांचे अनमोल असे मार्गदर्शन लाभले. सरांचा साहित्याचा व्यासंग, वक्तशीरपणा, त्यांची मनमिळावू वृत्ती आणि प्रेमळ स्वभाव हे सारेच मला आजपर्यंत भुरळ घालत आले आहे. सरांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनाशिवाय हा शोधप्रबंध पूर्ण होऊच शकला नसता, म्हणूनच या संशोधनाचे सारे श्रेय मी त्यांना देऊ इच्छितो. त्याचबरोबर मी ज्या विवेकानंद कॉलेजमधून बी. ए. ची परीक्षा पास झालो, त्या कॉलेजचे प्राचार्य डॉ. एच. बी. पाटील सर यांनीही वेळोवेळी मला हवी

ती मदत केली आहे. सरांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे ऋण शब्दात व्यक्त करणे केवळ अशक्य आहे. त्यांचे आभार मानून मला त्यांच्या मायेला मर्यादा आणायच्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या ऋणातच राहणे मी अधिक पसंत करतो.

मी ज्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेत शिकलो तेथील सर्व शिक्षकांचे मी या संशोधनाच्या निमित्ताने आभार मानतो. तसेच नाईट कॉलेज, कोल्हापूर येथील सर्व प्राध्यापकवृंदाचे आभार मानणे मी माझे आद्यकर्तव्य समजतो. त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, डॉ. कृष्णा किरवले, डॉ. रवींद्र ठाकूर, डॉ. रणधीर शिंदे, प्रा. हिमांशू स्मार्त यांनी वेळोवेळी आपले बहुमोल मार्गदर्शन करून मला संशोधन कार्यात कोणतीही अडचण येऊ दिली नाही. त्याबद्दल त्यांचेही शतश: आभार ! मराठी विभागातील लिपीक शिगांवकर मॅडम, सेवक मिनाक्षी स्वामी, कुसुंबेमामा यांनी कार्यालयीन कामामध्ये केलेले सहकार्य बहुमोल असेच आहे.

आयुष्यभर हाडाची काडं करून माझ्या शिक्षणासाठी झटलेल्या आईवडिलांचे आभार मानताना थोडं अवघडल्यासारखं वाटतय खरं; पण या संशोधनाच्या निमित्ताने मी त्यांच्या कष्टाचे चीज करतोय याचा मात्र मलाच अभिमान वाटतोय हे नक्की. तसेच माझी पत्नी वासंती हिने केलेल्या सहकार्याला शब्दात मांडणे केवळ अशक्य आहे. तिचा प्रेमळ स्वभाव नेहमीच मला धीर देत आला आहे. तसेच कन्या ज्ञानदा हिचाही येथे नामोल्लेख केल्याशिवाय मला राहवत नाही. माझे आजी-आजोबा त्याचबरोबर लहान भाऊ संतोष, माझे चुलते शिवाजी (भाऊ), अरविंद (आदा), पांडुरंग (तात्या), कृष्णात (पापा) यांचेही आशीर्वाद व प्रेरणा सतत माझ्या पाठीशी आहेत. त्याचबरोबर इतर वडीलमंडळी विलास कुंभार, अंकुश पाटील, शरद

गायकवाड, निवास गायकवाड, बी. डी. पाटील, बळीराम पाटील, माझे सासरे नामदेव जगताप, शिवाजी बोंगाळे, संजय बचाटे यांचेही ऋण शब्दात व्यक्त करणे इतके सोपे नक्कीच नाही.

सहअध्यायी मित्र-मैत्रिणींमध्ये संजय गावडे, सरदार जाधव, हंबीरराव चौगले, अनिल परीट, विनोद गुरव, सुहास चवरे, अतुल पाटोळे, सदानंद आग्रे, बाळकृष्ण पाटील, अजित बंगे, गणेश बंगे, अमोल चांदेकर, पद्माकर वानखडे, पवन चांदेकर, राहूल जाधव, सरदार कुंभार, विजय पाटील, प्रदीप कांबळे, चंद्रकांत कदम, सुभाष पाटील, शिवराज शिंदे, शिवदास पवार, विनोद राऊत, डॉ. अमर लवटे, डॉ. राहूल पाटील, अमर पाटील, शिवानंद पाटील, संदीप पाटील, चंद्रकांत पाटील, प्रल्हाद पाटील, अजित शिंदे, संतोष काळे, संतोष बोंगाळे, प्रा. भारत भोसले, वैशाली चौगले, संतोषी कुंभार, रुपाली जाधव, वीणा दास यांचेही सहकार्य या संशोधनाच्या कामी उपयुक्त ठरले.

शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयातील मातेकर सर, एन. बी. पाटील मॅडम, साठे सर आणि डी. आर. के. कॉलेजमधील ग्रंथपाल टी. एल. कांबळे सर यांनीही आपुलकीने संदर्भपुस्तके पुरविली. त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार!

'श्री समर्थ कॉम्प्युटर्स'चे विनोद ढगे व सौ. गीतांजली ढगे यांनी संगणक टंकलेखनासाठी घेतलेले परिश्रम खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. त्यामुळेच हा शोधप्रबंध वेळेत पूर्ण झाला, त्याबद्दल त्यांचेही शतश: आभार.

सागर विष्णुपंत बंगे